तत्त्वज्ञान विषयाच्या प्रचार व प्रसाराच्या उद्देशाने !

प्रभू श्रीरामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ तोंडगाव द्वारा संचालित
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

तत्त्वज्ञान विभाग द्वारा अयोजित

तत्त्व-प्रकाश व्याख्यानमाला

पुष्प आठवे

दिनांक : 15 में 2022, वेळ : रात्री : 08 वा.

-: वक्ते :-

मा. डॉ. लता छत्रे

माजी तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

-: विषय :-

धर्मकीर्ति यांचे तत्त्वज्ञान

(**1985** या वर्षी डॉ. लता छत्रे यांना **'Dharmakirti's Philosophy : A fresh study'** या विषयाला अनुसरून पुणे विद्यापीठाने **Ph. D.** पदवी प्रदत्त केली आहे.)

प्रत्येक महिन्याच्या 15 तारखेला रात्री 08 वाजता

-: विनीत :-

डॉ. वेदप्रकाश डोणगावकर (मठवाले)
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम
मो. 9096908100

https://meet.google.com/buf-dcub-vho

धर्मकीर्ति हा समन्वयवादी तत्त्वज्ञ आहे - डॉ. लता छत्रे

गोटे महाविद्यालयाच्या 'तत्त्व-प्रकाश व्याख्यानमालेचे' आठवे पुष्प संपन्न

(आजादी का अमृत महोत्सव आणि बुद्ध पौर्णिमा विशेष)

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागाद्वारे, तत्त्वज्ञान विषयाचा प्रचार व प्रसार करणे आणि संशोधकांचे संशोधन समोर आणणे या उद्देशाने 'तत्त्व-प्रकाश' व्याख्यानमाला आयोजित केली जाते. या व्याख्यानमालेचे आठवे पुष्प सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथील तत्त्वज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख तथा बौद्ध तत्त्वज्ञानाच्या अभ्यासिका डॉ. लता छत्रे यांनी गुंफले. डॉ. लता छत्रे यांनी 1985 या वर्षी पुणे विद्यापीठातून डॉ. एम. पी. मराठे यांच्या मार्गदर्शनात " धर्मकीर्तिस फिलोसोफी : ए फ्रेश स्टडी" या विषयावर संशोधन केले. सदर संशोधन विषयाला अनुसरुन 15 में 2022 या दिवशी त्यांनी 'धर्मकीर्ति यांचे तत्त्वज्ञान' या विषयावर आपले व्याख्यान दिले.

डॉ. छत्रे यांनी आपल्या व्याख्यानातून, गौतम बुद्धाने केलेले उपदेश, त्या उपदेशाचे झालेले संकलन आणि त्यावर झालेले भाष्य यावर प्रकाश टाकला. यावेळी त्यांनी त्रिपीटिकांचा आधार घेत बौद्ध दर्शनकार नागार्जुन, वसूबंधू आणि दिग्नाग यांनी कशा पद्धतीने बुद्धांच्या विचाराला आकार दिला हे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याच बरोबर त्यांनी धर्मकिर्तिच्या दृष्टिकोनातून या तिन्ही तत्त्ववेत्त्यांच्या विचाराची समीक्षा करीत धर्मकीर्ति याने नेमके काय तत्त्वज्ञान सांगितले हे उपस्थितांसमोर मांडले. त्यात प्रामुख्याने धर्मकीर्ति बाह्य जगताकडे कशा पद्धतीने पाहतो. त्याने प्रत्यक्ष आणि अनुमान या प्रमाणांच्या संदर्भात जी भूमिका मांडली आहे ती कशाप्रकारे इतरांपेक्षा वेगळी आहे. अशा अनेक विषयांचा उलगडा करीत असताना धर्मकीर्ति हा बौद्ध दर्शनातला एक समन्वयवादी तत्त्वज्ञ आहे; याविषयीचा संकेत डॉ. छत्रे यांनी या प्रसंगी केला.

व्याख्यानाच्या प्रारंभी व्याख्यानमालेचे आयोजक तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांनी वक्त्यांचा परिचय करुन देत व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. यावेळी त्यांनी सध्या भारतामध्ये आजादी का अमृत महोत्सव साजरा केला जात आहे आणि त्या अनुषंगाने भारतीय तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा जागर करण्याच्या हेतुने आजचे हे व्याख्यान महत्वाचे असल्याचे सांगितले. याशिवाय याच महिन्यामध्ये बुद्धपौर्णिमा असल्याकारणाने बुद्धाच्या विचारांना व्यवस्थित आकार देणाऱ्या 'धर्मकीर्तिचे तत्त्वज्ञान' या विषयावर होऊ घातलेले हे व्याख्यान वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे ही त्यांनी सांगितले. व्याख्यानानंतर व्याख्यात्यांचे व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्रच्या बहेरिल विविध विद्यापीठातील प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी आणि तत्त्वज्ञान प्रेमी उपस्थित होते.

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim

Prabu Shri Ramchandra Shikshan Prasarak Mandal, Tondgaon's

Matoshri Shantabai Gote Art's, Commerce & Science College, Washim

Department of Philosophy's

Tattva-Prakash Vyakhyanmala

(Stablished For Research & It's Methodology in Philosophy)

Introduction of Spiker

Topic of Lecture:	धर्मकिर्तीचे तत्त्वज्ञान
Date of Lecture:	15/05/2022
Name of Spiker:	Dr. Lata Chatre
Date of Birth:	07/07/1954
Qualification:	M.A. Philosophy & Anthropology Ph. D. (1985)
Ph. D. Topic:	Dharmakirtis Philosophy : A Fresh Study
His / Her Research Guide:	Prof. M. P. Marathe (Pune University, Pune)
Work Place & Post :	1) Professor (2000-2017) & Head (2015-2017) at Dept. Of Philosophy, Pune University, Pune
Publication:	1) Budhist Logic : Dharmakirtis Philosophy : A Fresh Study 2) Abhidhammakosh : A Study With a New Perspective 3) Budhist Epistemology : Logic and Language 4) A philosophical Devlopment of Budhist Theory of Apoha 5) बौद्ध दर्शनातील स्त्री विचार
Projects:	1) Budhist theory of Human action with refrence ti Abhidhammakosh 2) Theory of Apoha A Glimpse to Nayay & Budhist controversy 3) Budhist Theory of Conciseness 4) Gautam Budha and reconstruction of Society. 5) वारली अदिवासींची संस्कृती 5) रा. धो. कर्वे यांचे कार्य
Award:	1) Jivan Gaurav Puraskar by Mahila Darshanik Parishad – 2002 2) Sarsvat Puraskar 3) Ruiya Rtana Puraskar by Ruiya Colleg, Mimbai
Interest Aria / Hobs :	Buddhism,
Any Other	Budhist Logic : Dharmakirtis Philosophy : A Fresh Study

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com.& Sci.College,Washim


Inbox (4) - Dongaonkar@vedpra
Meet – तत्त्व-प्रकाश व्याख्यानमा
https://meet.google.com/buf-dcub-vho?pli=1&authuser=0
REC
Lata Chhatre
You
Surendra Gaidhane
N B
38 others
20:42 | तत्त्व-प्रकाश व्याख्यानमाला : आठवे पुष्प
Type here to search
100%
34°C
ENG
IN
8:42 PM
15/05/2022

देशोन्नती

धर्मकीर्ति हा समन्वयवादी तत्वज्ञ आहे -डॉ.लता छत्रे

गोटे महाविद्यालयाच्या 'तत्त्व-प्रकाश व्याख्यानमालेचे' आठवे पुष्प संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन...

वाशिम ■ मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागाद्वारे, तत्त्वज्ञान विषयाचा प्रचार व प्रसार करणे आणि संशोधकांचे संशोधन समोर आणणे या उद्देशाने 'तत्त्व-प्रकाश' व्याख्यानमाला आयोजित केली जाते. या व्याख्यानमालेचे आठवे पुष्प सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथील तत्त्वज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख तथा बौद्ध तत्त्वज्ञानाच्या अभ्यासिका डॉ. लता छत्रे यांनी गुंफले. डॉ. लता छत्रे यांनी १९८५ या वर्षी पुणे विद्यापीठातून डॉ. एम. पी. मराठे यांच्या मार्गदर्शनात 'धर्मकीर्तिस फिलोसोफी : ए फ्रेश स्टडी' या विषयावर संशोधन केले. सदर संशोधन विषयाला अनुसरुन १५ मे २०२२ या दिवशी त्यांनी 'धर्मकीर्ति यांचे तत्त्वज्ञान' या विषयावर आपले व्याख्यान दिले.

डॉ. छत्रे यांनी आपल्या व्याख्यानातून, गौतम बुद्धाने केलेले उपदेश, त्या उपदेशाचे झालेले संकलन आणि त्यावर झालेले भाष्य यावर प्रकाश टाकला. यावेळी त्यांनी त्रिपीटिकांचा आधार घेत बौद्ध दर्शनकार नागार्जुन, वसूबंधू आणि दिग्नाग यांनी कशा पद्धतीने बुद्धांच्या विचाराला आकार दिला हे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याच बरोबर त्यांनी धर्मकिर्तिच्या दृष्टिकोनातून या तिन्ही तत्त्ववेत्त्यांच्या विचाराची समीक्षा करीत धर्मकीर्ति याने नेमके काय तत्त्वज्ञान सांगितले हे उपस्थितांसमोर मांडले. त्यात प्रामुख्याने धर्मकीर्ति बाह्य जगताकडे कशा पद्धतीने पाहतो, त्याने प्रत्यक्ष आणि अनुमान या प्रमाणांच्या संदर्भात जी भूमिका मांडली आहे ती कशाप्रकारे इतरांपेक्षा वेगळी आहे. अशा अनेक विषयांचा उलगडा करीत असताना धर्मकीर्ति हा बौद्ध दर्शनातला एक समन्वयवादी तत्त्वज्ञ आहे; याविषयीचा संकेत डॉ. छत्रे यांनी या प्रसंगी केला.

व्याख्यानाच्या प्रारंभी व्याख्यानमालेचे आयोजक तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांनी वक्त्यांचा परिचय करुन देत व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. यावेळी त्यांनी सध्या भारतामध्ये आजादी का अमृत महोत्सव साजरा केला जात आहे आणि त्या अनुषंगाने भारतीय तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा जागर करण्याच्या हेतुने आजचे हे व्याख्यान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. याशिवाय याच महिन्यामध्ये बुद्धपौर्णिमा असल्याकारणाने बुद्धाच्या विचारांना व्यवस्थित आकार देणाऱ्या 'धर्मकीर्तिचे तत्त्वज्ञान' या विषयावर होऊ घातलेले हे व्याख्यान वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे ही त्यांनी सांगितले. व्याख्यानानंतर व्याख्यात्यांचे व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्रच्या बहेरिल विविध विद्यापीठातील प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी आणि तत्त्वज्ञान प्रेमी उपस्थित होते.(ता.प्र.)

Deshonnati Edition
May 19, 2022 Page No. 6
Powered by : eReleGo.com